# ठराव क्र. १, दिनांक १७/११/२०१८

विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ६०(१) अन्वये पुणे महानगर प्रदेशामधील वडीचीवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र.२, औताडे हांडेवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र.३, होळकरवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र.४ व ५ तयार करण्यासाठी उद्घोषणा जाहीर करणेबाबत.

**ठराव :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २६/०३/२०१८ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र. ३(ड) नुसार पुणे महानगर क्षेत्रात हाती घेतलेल्या व हाती घ्यावयाच्या नगर रचना योजनांबाबतचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ६०(१) व (२) अन्वये नगर रचना योजना तयार करण्याचा उद्देश जाहीर करणे व प्रसिध्द करणे व त्यानुषंगिक होणाऱ्या इतर खर्चासाठी प्राधिकरणाचे अधिकार महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

पुणे महानगर प्रदेशामधील वडीचीवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र.२, औताडे हांडेवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र.३, होळकरवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र.४ व ५ तयार करण्यासाठी उद्घोषणा जाहीर करण्याचा ठराव क्र.३, दिनांक ३०/०१/२०१८ पारित करण्यात आलेला होता. सदर ठरावानुसार जाहीर सूचना उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार ३० (तीस) दिवसांच्या आत महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेली नसल्याने वैधानिक कार्यवाही पूर्ण होत नसल्याने व्यपगत झालेली आहे. त्यामुळे सदरच्या नगर रचना योजनांबाबत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६०(१) मधील तरतुदीनुसार आणि याबाबत सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन पुणे महानगर प्रदेशामधील खाली नमूद केलेल्या क्षेत्रासाठी :

१) **वडाचीवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र.२,**
२) **औताडे हांडेवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र.३,**
३) **होळकरवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र.४**
४) **होळकरवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र. ५**

तयार करण्याची उद्घोषणा जाहीर करत आहे. हे क्षेत्र जास्त खुलाशाने सोबतच्या नकाशात कि ज्यावर मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तारखेसह स्वाक्षरी केली आहे. त्यात गुलाबी किनारीने दर्शविलेले आहे.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६०(२) अनुसार प्रदत्त असलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबत सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन राजपत्रात आणि स्थानिक दैनिक वृत्तपत्रात विहीत कालमर्यादेत उद्घोषणा प्रसिध्द करण्यास आणि पुढील सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यासाठी व आवश्यक तो खर्च करण्यासाठी महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६०(३) अन्वये सदरहू उद्घोषणा आणि वडीचीवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र.२, औताडे हांडेवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र.३, होळकरवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र.४ व होळकरवाडी प्रारुप नगर रचना योजना क्र. ५ चे

Scanned with CamScanner

प्रस्तावित क्षेत्र दर्शविणारे नकाशे, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुख्य नोटीस बोर्डावर पहाण्यासाठी कार्यालयीन वेळेत कामकाजाच्या दिवशी आम जनतेच्या माहितीसाठी / अवलोकनार्थ चिकटवून प्रसिध्द करावी. तसेच नोटीस व नकाशाची प्रत महाराष्ट्र शासन आणि संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व इतर सर्व यांच्याकडे कलम ६०(२) अन्वये पाठविण्यासाठी महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

तात्पुरती प्रारुप नगर रचना योजना कलम ६१(१) अन्वये तथा महाराष्ट्र नगर रचना योजना नियम, १९७४ च्या कलम ४(१) नुसार तयार केल्यानंतर जमिनमालकांना सदरहू योजना समजावून सांगण्यासाठी तथा आलेल्या सूचनांनुसार आवश्यक तेथे दुरुस्ती / बदल / फेरफार करण्यासाठी तसेच संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी प्रारुप नगर रचना योजनेबाबत सल्लामसलत केल्यानंतर आवश्यक तेथे दुरुस्ती / बदल /फेरफार करण्यासाठी महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील नगर रचना योजनेबाबत असलेल्या सर्व तरतुदीनुसार सर्व टप्प्यावरील वैधानिक कार्यवाही पार पाडण्याकरिता, प्रसिध्द करण्याकरिता आलेल्या हरकती / सूचनां बाबत सुनावणी घेऊन व त्यावर योग्य तो निर्णय घेऊन प्रारुप नगर रचना योजना कलम ६८(२) अन्वये मंजूर करण्यास महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना या ठरावाद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

(किरण गित्ते)
सदस्य सचिव,
तथा महानगर आयुक्त तथा मु.का.अ.
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

Scanned with CamScanner